जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 MAR 2010

पुढारी

माणगाव परिषद शताब्दी वर्षानिमित्त वर्षभर कार्यक्रम : डॉ. शिर्के यांची घोषणा

कोल्हापूर : प्रतिनिधी

माणगाव येथील ऐतिहासिक परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने शिवाजी विद्यापीठातर्फे विद्यापीठासह माणगाव येथे विविध उपक्रम राबविण्यात येतील, अशी घोषणा प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे माणगाव परिषद शताब्दी वर्षाचे औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी आलोक जत्राटकर यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांचे स्नेहबंध' या विषयावर विचार मांडले. प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाच्या पद्मश्री ग. गो. जाधव अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सर्जेराव पद्माकर, कास्ट्राईबचे आनंद खामकर उपस्थित होते.

माणगाव परिषदेबाबत कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे माणगाव परिषदेबाबत कागदपत्रे, छायाचित्रे, आठवणी यांचे संकलन करण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. ज्यांच्याकडे त्या संदर्भातील कागदपत्रे असतील त्यांनी ती केंद्राकडे सुपूर्द करावीत, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले आहे.

23 MAR 2019

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

माणगाव परिषदेची शताब्दी साजरी करणार

प्र- कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची घोषणा : विद्यापीठात शताब्दी वर्षाचे औपचारिक उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

माणगाव येथील ऐतिहासिक परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठासह माणगाव येथेही विविध उपक्रम राबविण्यात येतील, अशी घोषणा प्र-कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांनी आज येथे केली.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने माणगाव परिषद शताब्दी वर्षाचे औपचारिक उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी.जी. कणसे प्रमुख उपस्थित होते.

शिर्के म्हणाले, माणगाव परिषद ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या स्नेहबंध निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे या दोघांचे परस्परसंबंध, मैत्रभाव दर्शविणारी कागदपत्रे, पत्रे, छायाचित्रे आदींचे संकलन करण्याबरोबरच संशोधन, चर्चासत्रे, व्याख्याने आयोजित करण्यात याबीत. माणगाव परिषदेत जे महत्त्वाचे ठराव करण्यात आले, त्यासंदर्भात गेल्या शंभर वर्षात आपण किती प्रगती केली, याचाही संशोधकीय धांडोळा केंद्राच्या वतीने घेण्यात यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कोल्हापूर : माणगाव परिषद शताब्दी वर्षाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. श्रीकृष्ण महाजन.

आलोक जत्राटकर म्हणाले, माणगाव येथे २१-२२ मार्च १९२० रोजी बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली झालेली दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृतांची पहिली परिषद आणि त्यानंतर ३०-३१ मे १९२० रोजी राजर्षी शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद या दोन परिषदा या दोघांचे विचार व स्नेहसंबंध समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताच्या सामाजिक चळवळीला या दोन व्यक्तीमत्त्वांनी प्रदान केलेले अधिष्ठान व प्रेरणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे त्यांचा संशोधकीय अभ्यास होणे नितांत गरजेचे आहे.

प्रास्ताविक केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. डॉ. अविनाश माले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. सर्जेराव पद्माकर, कास्ट्राईबचे आनंद खामकर यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने माणगाव परिषदेबाबत कागदपत्रे, छायाचित्रे, आठवणी यांचे संकलन करण्याचा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला असून ज्यांच्याकडे त्या संदर्भातील कागदपत्रे असतील, त्यांनी ती केंद्राकडे सुपूर्द करावीत, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले आहे.

शताब्दीनिमित्त पहिले व्याख्यान उद्या

माणगाव परिषदेच्या शताब्दीच्या निमित्ताने आंबेडकर केंद्राच्या वतीने वर्षभरात विविध व्याख्यानांचे आयोजन करण्यात येणार आहे. या मालेतील पहिले पुष्प प्रा. विनय कांबळे 'माणगाव परिषद आणि तिचे सामाजिक राजकीय संदर्भ' या विषयावर शनिवारी (दि. २३) सकाळी १०.३० वाजता गुंफणार आहेत.